## मुंबई विद्यापीठ

क्र.वि.क./४४९/२००९

**अत्यंत महत्वाचे**

**हस्ते बटवडा**

**परिपत्रक:**

सर्व विद्यापीठ विभाग प्रमुख, प्राचार्य/संचालक, संलग्नीत अशासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान विधी, शिक्षणशास्त्र, अभियांत्रिकी, वास्तुशास्त्र, व्यवस्थापन व तत्सम महाविद्यालये यांना कळविण्यात येते की, शासन परिपत्रक दिनांक २४ जून, २००९ सोबत जोडलेल्या प्रपत्रानुसार माहिती उपकुलसचिव, विशेष कक्ष, खोली क्र. १३३, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांना पाठविण्यात यावा.

दिनांक : २ डिसेंबर, २००९
स्थळ : मुंबई.

प्रा. कृ. व्यंकटरमणि
कुलसचिव

---

## महाराष्ट्र शासन

**न्यायालयीन प्रकरण प्राथम्य**
**कालमर्यादा**

**क्रमांक** : अपंग-२००९/(२७१/२००९)/आस्था-२
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ ऑक्टोबर, २००९

प्रति,
सहसचिव, (व्यशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
सहसचिव, (मशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
उपसचिव, (तांशि-१/तांशि-६), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
उपसचिव, (विशि-१), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
उपसचिव, (साशि-५), उच्च व तंत्र शिक्षण विभाग,

**विषय: - सर्व संवर्गातील सर्व पदांवर अपंग आरक्षण निश्चिती ..**
संदर्भ: - सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे पत्र क्र.न्यायाप्र-२००९/प्र.क्र.७४/सुधार-३. दिनांक ०९/१०/२००९.

महोदय,

सचिव, सामाजिक न्याय विभाग यांचे संदर्भाधिन पत्र सोबत जोडले आहे. पत्रातील परीच्छेद क्र.४ मध्ये विभागाच्या अधिनस्त सर्व प्रशासकीय विभागातील सर्व संवर्गातील पदांची कर्तव्ये/जाबाबदाऱ्या/कामकाजाचे स्वरुप/तांत्रिक/अतांत्रिकता क्षेत्रिय कार्यालये इत्यादी बाबतीतील प्रत्येक संवर्गाची माहिती (उदा. कार्यालयील अधिक्षक, लिपिक, स्टेनो, टंकलेखक, विस्तार अधिकारी, शिक्षक, अभियंता इ.) सामाजिक न्याय विभागाकडे दिनांक २६ ऑक्टोबर, २००९ पर्यंत सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी सादर करावी व न्यायालयीन प्राथमिकता म्हणून तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती केली आहे. या अनुषंगाने आपल्या अखत्यारितील संचालनालये / विद्यापीठे यांचे कडील सर्व गटातील, सर्व संवर्गातील सर्व पदांची माहिती संबंधित आस्थापना कार्यासनांनी तपासून व प्रमाणित करुन एकत्रित माहितीच्या सोबत जोडलेल्या विहीत प्रपत्रातील चार प्रती (सॉफ्ट कॉपी व हार्ड कॉपी) कार्यासन आस्था-२ यांना दिनांक ३१/१०/२००९ पर्यंत निश्चितपणे उपलब्ध करुन दयावी. सदर माहिती ही मा.उच्च न्यायालयाला सादर करावयाची असल्याने ती बिनचूक असेल याची खात्री करुन घ्यावी.

तसेच, आपल्या अखत्यारितील अपंगासाठीची अनुशेषाची राखीव पदे दिनांक ३१ डिसेंबर, २००९ पर्यंत भरण्यात येणार असल्याचे प्रतिज्ञापत्र सामाजिक न्याय विभागामार्फत मा.उच्च न्यायालयामध्ये सादर केले आहे. त्याअनुषंगाने सदर पदे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ डिसेंबर, २००९ पर्यंत भरण्याची दक्षता घ्यावी. अनुशेषाची पदे भरण्याचा दर पंधरवडयाचा अहवाल मा.उच्च न्यायालयास, सामाजिक न्याय विभागामार्फत सादर करण्यासाठी पंधरवडयानंतर दोन दिवसात कार्यासन आस्था-२ ला उपलब्ध करुन दयावा, ही विनंती.

आपला विश्वासू,

सही/-
(दि. धों. तिवरेकर)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

सहपत्र - वरील प्रमाणे

प्रत सहपत्रासह तात्काळ कार्यवाहीसाठी. माहिती विहीत मुदतीत निश्चितपणे उपलब्ध करुन दयावी.
सर्व संचालक / कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
कार्यासन अधिकारी (व्यशि-१, मशि-१ तांशि-१, तांशि-६, विशि-१, साशि-५, उच्च व तंत्र शिक्षण विभाग)
मा. प्रधान सचिव यांचे स्वीय सहायक, उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

## महाराष्ट्र शासन

क्रमांक : न्यायाप्र २००९/प्र.क्र. ७४/सुधार-३
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: ०९ ऑक्टोबर, २००९.

प्रति,
अप्पर मुख्य सचिव / प्रधानसचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.

विषय:- शासकीय निमशासकीय सेवांमधील /सवंर्गनिहाय पदनिश्चिती करुन सर्वसमावेशक एकच शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत ...

महोदय / महोदया,

अपंग व्यक्तींचे शासकीय / निमशासकीय सेवातील विविध संवर्गात पदनिश्चित (Post Indentification) संदर्भात शासनस्तरावर सर्व मंत्रालयीन विभागांनी स्वतंत्ररित्या शासन निर्णय निर्गमित केले आहेत. याबाबत सामायिक पदांसंदर्भातील पद निश्चितीत एकसूत्रता दिसून येत नाही. ही बाब मा. न्यायालयात याचिकाकर्त्यांनी उपस्थित करुन सर्वसमावेशक एकत्रितपणे एकच शासन निर्णय करणेची मागणी केलेली आहे. तसेच याबाबतीत केंद्र शासनाने सर्व विभागांचा एकत्रितपणे एकच शासन निर्णय सामाजिक न्याय विभागामार्फत निर्गमित केला असून, राज्यांनी देखील त्याची अंमलबजावणी करावी असे निर्देश आहेत.

२. राज्य शासनाच्या अखत्यारितील सर्व विभागांनी यापूर्वी स्वतंत्ररित्या निर्गमित केलेले पद निश्चितीचे शासन निर्णय एकत्र करुन एकत्रितपणे एकच शासन निर्णय करण्याच्या कार्यवाहीसाठी सामाजिक न्याय विभागाने तज्ञ समितीची उपसमिती नेमून या समितीमार्फत कार्यवाही करण्याचे ठरविले आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी समायिक शासन निर्णय करताना काही संवर्गाच्या पदनिश्चितीत बदल होणे आवश्यक आहे. याकरिता पदनिश्चिती निश्चित करतांना संबंधित पदांची कर्तव्ये/ जबाबबदाऱ्या /कामकाजाचे स्वरुप / तांत्रिक / अतांत्रिकता याबाबत स्वयंस्पष्ट माहिती उपसमितीमडे उपलब्ध असणे आवश्यक आहे. जेणेकरुन अचूक पदनिश्चिती करुन स्वयंस्पष्ट असा एकच शासन निर्णय निर्गमित करता येईल.

४. सबब आपणांस विनंती करण्यात येते की, आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व प्रशासकीय विभागातील सर्व संवर्गातील पदांची कर्तव्ये/ जबाबबदाऱ्या /कामकाजाचे स्वरुप / तांत्रिक / अतांत्रिकता क्षेत्रय कार्यालये इत्यादी बाबतीतील प्रत्येक संवर्गाची माहिती (उदा. कार्यालयीन अधिक्षक, लिपिक, स्टेनो, टंकलेखक, विस्तार अधिकारी, शिक्षक, अभियंता इत्यादी) सामाजिक न्याय विभागाकडे दिनांक २६ ऑक्टोबर, २००९ पर्यन्त Soft copy & Hard copy मध्ये सादर करावी. न्यायालयीन प्राथमिकता म्हणून प्रस्तूत प्रकारणी तातडीने कार्यवाही करावी अशी विनंती आहे.

५. शासकीय / निमशासकीय सेवेतील अपंगांसाठी राखीव असलेली पदे दिनांक ३१ डिसेंबर, २००९ अखेर भरण्यात येणार असल्याचे प्रतिज्ञापत्र सर्व मंत्रालयीन विभागाच्या वतीने सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात आले आहे ही बाब आपणांस विदितच आहे. त्या अनुषंगाने आपल्या विभागाच्या अखत्यारितील अपंग अनुशेष भरतीची पदे कोणत्याही परिस्थितीत दिनांक ३१ डिसेंबर, २००९ पर्यन्त भरण्यात यावीत. सदर प्रकरण पुढील सुनावणी दिनांक ७ जानेवारी, २०१० रोजी आहे. तरी न्यायालयाचा अवमान होणार नाही याबाबत सर्व नियुक्ती प्राधिकाऱ्यांना आपल्या मार्फत सूचना देण्यात याव्यात अशीही विनंती आहे.

आपला

सही/-
(किशोर गजभिये)
सचिव, सामाजिक न्याय

उच्च व तंत्र शिक्षण विभाग

कार्यालय : -

| अ.क्र. | गट व संवर्ग | पदांची कर्तव्ये | [illegible] | [illegible] | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |